9 JAN 2026

# राष्ट्रीय आरोग्य अभियान

## जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटूंब कल्याण सोसायटी, नांदेड

www.zpnanded.in

## समुदाय आरोग्य अधिकारी यांच्या आंतर जिल्हा बदली बाबत सुचना

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कार्यरत समुदाय आरोग्य अधिकारी यांच्या आंतरजिल्हा बदली बाबत राज्यस्तरावरुन दि.०६/०१/२०२६ रोजी व्हिडीओ कॉन्फरन्स द्वारे सुचना देण्यात आल्या त्यामध्ये आंतरजिल्हा बदली बाबत दि.१२ जानेवारी २०२६ व १३ जानेवारी २०२६ रोजी समुपदेशनाद्वारे ऑनलाईन बदली प्रक्रिया करण्याबाबत खालील प्रमाणे सुचना देण्यात आल्या आहेत.

**आंतरजिल्हा बदली मार्गदर्शक सुचना-**

१) ज्या उमेदवारांनी विहीत कालावधीत, विहीत नमुन्यात आंतर जिल्हा बदलीबाबत अर्ज सादर केलेला आहे त्यांचाच समुपदेशनाबाबत विचार करण्यात येईल.

२) समुदाय आरोग्य अधिकारी यांच्या आंतरजिल्हा बदली प्रक्रिया समुपदेशनाने **जिल्हा प्रशिक्षण केंद्र मल्टीपर्पज हायस्कुलच्या पाठीमागे, वजिराबाद नांदेड या ठिकाणी** दि.१२ जानेवारी २०२६ व १३ जानेवारी २०२६ या कालावधी आयोजीत करण्यात आलेले आहे.

३) आंतरजिल्हा बदली पात्र उमेदवारांनी दिलेल्या दिनांकास आपल्या सर्व कागदपत्रासह जिल्हा प्रशिक्षण केंद्र, मल्टी पर्पज हायस्कुलच्या मागे सकाळी ९.०० ते ९.३० या वेळेत उपस्थीत राहावे. वेळेवर उपस्थीत न राहील्यास त्यास आपण स्वतः जवाबदार असाल याची नोंद घ्यावी. समुपदेशनाकरीता वेळेवर येणाऱ्या समुदाय आरोग्य अधिकारी यांनाच संधी मिळेल विलंबाने आलेल्या समुदाय आरोग्य अधिकारी यांचा जेष्ठता अनु क्रमांक झालेला असल्यास सेवा जेष्ठतेनुसार संधी मिळणार नाही, उमेदवारांच्या उपस्थीतीनंतर त्यांना संधी देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

४) आंतर जिल्हा बदली ही संपुर्णपणे प्रशासकिय स्वरुपाची बाब असल्यामुळे समुदाय आरोग्य अधिकारी यांनी राजकीय दबाव वापरल्यास महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणुक) नियम १९८१ मधील नियम २३ चा भंग केलाम्हणुन ती कृती शिस्तभंगाच्या कार्यवाहीस पात्र राहील.

**जिल्हा आरोग्य अधिकारी,**
**जिल्हा परिषद, नांदेड**